(21)



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** माजलगांव शहर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0037 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/02/2019 19:19 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 12/02/2019

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/02/2019

**Time From (वेळेपासून):** 15:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/02/2019 **Time (वेळ):** 19:08 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 031 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/02/2019 19:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** माजलगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** हनुमंत बालासाहेब सुरवसे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
:

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1994 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(22)



(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बाभुळगाव, तामाजलगाव ,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बाभुळगाव, तामाजलगाव ,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अरूण गणपत राठोड | | | 1. शिक्षक कलनी, माजलगाव, ,माजलगांव शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या दोन नोटा असे एकुन 1000 रुपये | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्यादिदि.12/02/2019माजलगाव, ता.माजलगाव, जि.बीड.मी हनुमंत बालासाहेब सुरवसे, वय-25 वर्षे, धंदा-शेती, रा.बाभुळगाव, ता. माजलगाव जि.बीड. मो.क्र. 7620028070. मी फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणार असुन शेती करतो. मी व माझे वडील बालासाहेब सुरवसे असे काल दि.11/02/2019 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे जावुन माझी लोकसेवक राठोड यांचेविरूध्द लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन माजलगाव येथे येवुन माझे तक्रारी नुसार कारवाई करणेबाबत विनंती केली होती. त्यानुसार माझी तक्रार घेवुन त्याप्रमाणे कारवाई करणेकामी आज रोजी पोलीस निरीक्षक गजानन वाघ हे सापळा पथक व पंचासह माजलगाव येथे आले त्यांनी मला व माझे वडिलांना सापळा पथकातील सर्व सदस्य व दोन्ही शासकिय पंचाचा परिचय करून दिला. त्यांनतर माझे कामाबाबत विचारपुस करून माझी तक्रार लिहुन घेतली व माझे कामासंबंधीचे कागदपत्रांची पोलीस निरीक्षक वाघ यांनी पाहणी केली मी पोलीस निरीक्षक वाघ यांचेसमक्ष दिलेल्या तक्रारीमध्ये नमुद केले की, माझे वडीलांचे नावे बाभुळगाव येथील गट नं.24 मधील जमिन मोजणीकरिता मी व माझे वडील भुमी अभिलेखप कार्यालय, माजलगाव येथे गेलो तेथे भुमापक राठोड यांनी माझेकडुन पुर्वी 2,000/- रु. घेतले आहेत व आणखी 1,000/- रु. ची मागणी करत आहेत. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी पोलीस निरीक्षक श्री.गजानन वाघ यांचे समक्ष माझी तक्रार आज रोजी दिली.मी दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस निरीक्षक वाघ यांनी प्रथम लोकसेवक राठोड हे माझ्याकडे माझे मोजणीचे कामासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानुसार मला व माझे वडीलांना सापळा कारवाई कशी असते याबाबत माहिती दिली व त्यासाठी वापरले जाणारे व्हाईस रेकर्डर बाबत माहिती दिली. त्यांनतर माझेजवळ व्हाईस रेकर्डर देवुन मला, माझे वडील व पंच क्र.1 मोरे यांचेसोबत लोकसेवक राठोड यांची भेट घेणेकामी भुमी अभिलेख कार्यालय, माजलगाव येथे पाठविले सदर ठिकाणी लोकसेवक राठोड हे हजर नव्हते त्यावर मी त्यांना फोन केला असता त्यांनी मला त्यांचे घरी बोलवले मी, माझे वडील व पंच मोरे असे लोकसेवक राठोड यांचे शिक्षक कलनी माजलगाव येथील घरी गेलोत तेथे राठोड यांनी मला सांगितले की, अर्ध्या तासाने कार्यालयात या असे सांगितले त्यानुसार आम्ही पुन्हा तालुका भुमी अभिलेख कार्यालय, माजलगाव येथे गेलोत तेथे काहि वेळाने लोकसेवक राठोड आले व त्यांनी मला माझे शेताची मोजणी करून देण्याचे कामासाठी 1,000/- रुपये मागितले त्यावर माझे वडिलांनी आम्ही गरीब असल्याचे सांगुन काही रक्कम कमी करणेबाबत विनवणी केली असता राठोड यांनी 1,000/- रुपये दिल्याशिवाय काम होणार नाही असे आम्हाला सांगितले. त्यांनतर आम्ही परत शासकिय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलोत तेथे आल्यानंतर पोक/ठाकुर यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर काढुन बंद केले. पोलीस निरीक्षक वाघ व दोन्ही पंच व सापळा पथकाने त्यातील संभाषण ऐकले व लोकसेवक राठोड यांची माझ्याकडे लाचेची मागणी केल्याचे सिध्द झाले. त्यानुसार सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक वाघ यांनी दोन्ही पंच व आम्हाला कळविले व केलेल्या सर्व कारवाईबाबत एकत्रित पंचनामा करण्याचे पंचाचे व

सापळा पथकाचे संमतीने ठरविले. त्यानंतर कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लँम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती दिली व प्रात्यक्षीक दाखवले. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघ यांनी नियोजित कारवाईचे अनुषंगाने सापळा पथक, दोन्ही पंच व आम्हाला सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघ यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी लागणारे 1,000/- रु. ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या दोन नोटा घेवुन त्याचे नंबर व वर्णन पंच क्र.2 धायरे यांचेकरवी नमुद करून घेतले व त्यास अँथ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे शर्टचे खिशामध्ये ठेवल्या व लोकसेवक राठोड यांनी लाचेची मागणी केल्यास नोटा द्याव्यात व त्यानंतर खिशातील हातरुमाल काढुन तो हातात घ्यावा असा इशारा नेमुन दिला. त्यानंतर माझेकडे पोलीस निरीक्षक वाघ यांनी व्हाईस रेकर्डर चालु करून दिले व मी, माझे वडील व पंच क्र.1 मोरे यांना तालुका भुमी अभिलेख कार्यालय माजलगाव येथे रवाना करून आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक वाघ सापळा पथकासह आले त्यानंतर माझी व माझे वडीलांची पंच क्र.1 यांचेसमक्ष लोकसेवक राठोड यांची भुमी अभिलेख कार्यालयाचे बाहेर भेट झाली त्यानंतर आमचेत माझे कामासंबंधी चर्चा झाली त्यानंतर लोकसेवक राठोड यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यानंतर मी त्यांना माझे शर्टचे खिशातुन लाचेच्या नोटा काढुन दिल्या व त्यांनी त्या स्विकारून त्यांचे पँन्टचे उजवे बाजुचे खिशात ठेवल्या त्यावर मी लागलीच मला नेमुन दिलेला पुर्वनियोजित इशारा 15.40 वा. केला.त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघ यांनी लोकसेवक राठोड यांना तालुका भुमी अभिलेख कार्यालय, माजलगावचे आवारातुन ताब्यात घेतले व त्यांना त्यांचे नाव, गाव व पत्ता याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव अरूण गणपत राठोड, वय-48 वर्षे, धंदा- नौकरी, नगर भुमापन लिपीक, उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, माजलगाव रा.शिक्षक कलनी, माजलगाव, ता.माजलगाव, जि.बीड असे सांगितले. त्यानंतर माझे कामासंबंधीचे कागदपत्र लोकसेवक राठोड यांचेकडुन ताब्यात घेतले व आम्ही सर्वजण उर्वरीत कारवाई करणेकामी पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे आलोत सदर ठिकाणी आलेनंतर पोलीस निरीक्षक वाघ यांनी त्यांचे कामकाजासाठी पोलीस ठाणे अंमलदार यांचेकडुन एक संगणक व प्रिंटरची सोय असलेले कक्ष उपलब्ध करून घेतले. त्यानंतर त्यांचे कामकाज सुरु केले व मला घडलेले घटनेची सर्व हकिगत सविस्तर सांगावी व त्याप्रमाणे फिर्याद द्या असे सांगितले. त्यानुसार मी वरील प्रमाणे घडलेल्या घटनेबाबत माझी फिर्याद पोलीस निरीक्षक वाघ यांचेसमक्ष कथन केली ती माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यासाठी पोलीस निरीक्षक वाघ यांनी पोक/ठाकुर यांना सांगितले त्याप्रमाणे ती टंकलिखीत करण्यात आलेली आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघ व त्यांचे सापळा पथकाने त्यांचे उर्वरीत कामकाजास सुरवात केली.तरी माझी अरूण गणपत राठोड, नगर भुमापन लिपीक, उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, माजलगाव यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. हि फिर्याद दिली ती माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.हनुमंत बालासाहेब सुरवसे,रा.बाभुळगाव, ता.माजलगाव जि.बीड.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे SHIVDARSHAN **Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): PSI **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): SULIMAN ALI AHEMAD ALI SAY

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

पोलिस ठाणे अंमलदार
पोलिस ठाणे माजलगाव शहर